| | |
|---|---|
| MHLA050000282019 | **नियमित दिवाणी दावा क्र.०५/२०१९**<br>**हेमंत वि. भूसंपादन अधिकारी** |

**<u>नि.क्र.१ खालील आदेश.</u>**

**१.** निशाणी क्र.३८ वरील आदेश पहा.

**२.** वादी यांनी दावा मागे घेतला असल्याने तो अंतिमत: निकाली काढण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक ०४/०५/२०२६.

**[ एस.एन.सरडे ]**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

| MHLA050000282019 | **नियमित दिवाणी दावा क्र.०५/२०१९**<br>**हेमंत वि. भूसंपादन अधिकारी** |
| --- | --- |

**<u>नि.क्र.३८ खालील आदेश.</u>**

सदरकामी वादींनी पुरसीस देवून कथन केले दिवाणी अपील क्र.१६/२०१६ मध्ये दि.१८/०४/२०२६ रोजी वादी व प्रतिवादी क्र.३ ते ९ यांच्यात तडजोड झाली असून त्यामुळे, सदरील दावा वादी मागे घेत आहे.

**०२.** प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र.३ ते ९ यांच्यासह भूसंपादन अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, लातूर आणि कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, लातूर यांच्याविरुध्द दाखल केला होता. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालला. प्रतिवादी क्र.३ ते ९ यांनी आपली कैफीयत दिली. त्यानूसार नि.क्र.२३ लगत मुद्दे निघाले. प्रस्तुत प्रकरणी दिवाणी अपील क्र.१६/२०१६ हे जिल्हा न्यायालय-१, अहमदपूर यांच्यापुढे दाखल होते. ते रे.दि.मु.क्र.२१/२०१३ मधील हुकूमनाम्याविरुध्द दाखल केले होते. त्याकामी दि.१८/०४/२०२६ रोजी तडजोड होवून त्याप्रमाणे वागण्याचे उभय पक्षकारांनी मान्य व कबुल केले असल्याने सदरील दाव्यातील सत्व संपून जाते. सबब, प्रस्तुत वादी यांची ओळख त्यांच्या विधीज्ञांनी दिलेली असल्याने आणि वादी हे स्वत: विधीज्ञ असल्याने व त्यांनी पुरसीसमधील मजकुर मान्य व कबुल केला असल्याने पुरसीस वाचून दाखल करण्यात येते. नि.क्र.१ वरील आदेश पहा.

**स्वाक्षरीत/-**

दिनांक ०४/०५/२०२६.

**[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.